भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र.२०६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०२/०५/२०१७

१) संगनमत करुन ट्रकमध्ये अवैधरित्या रेतीची चोरी करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोदं. :–

दिनांक ३०/०४/२०१७ चे २२.४० वा. दरम्यान यातील फिर्यादी हे गावातील चौकामध्ये गावकऱ्यासह हजर असतांना यातील आरोपी ट्रकचे चालक व मालक यांनी संगनमत करुन त्यांचे ताब्यातील ट्रक मध्ये प्रत्येकी ०७ ब्रास रेती किंमती ४२,०००/–रु. ची अवैधरित्या चोरी करुन ट्रक मध्ये भरुन वाहतुक करतांना मिळुन आल्याने फिर्यादी मेघेशाम श्रावण वैद्य वय ५८ वर्ष रा. मांगली चौरास यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३७९,३४ भांदवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. चुटे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहे.

२) संगनमत करुन जुन्या वादावरुन काठीने डोक्यावर मारुन, शिवीगाळ व जिवे मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक ३०/०४/२०१७ चे १९.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी व आरोपी यांचे घरासमोरील रस्त्यावरुन पुराणे वाद असुन यातील आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादी यास आरोपी क्र. २ ने व त्याचा मुलगा घनश्याम लक्ष्मण दिघोरे वय ३० वर्ष, यांना आरोपी क्र. १ ने काठीने डोक्यावर मारुन जखमी केले व थापड बुक्याने मारपीट करुन व शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी लक्ष्मण पुनाजी दिघोरे वय ६५ वर्ष, अक्की यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३२४,५०४,५०६,३४ भांदवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. जाधव पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

३) क्षुल्लक कारणावरुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक ०१/०५/२०१७ चे १५.०० वा. दरम्यान यातील आरोपीने फिर्यादीचे आईला शिवीगाळ करीत असल्याने तिने आरोपीला हटकले असता त्याने भांडण करुन अश्लिल शब्दात शिवीगाळ, मारपीट करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी सौ. प्रमीला मानापुरे वय ३१ वर्ष, रा. पवनी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २९४,३२३,५०६ भादवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. जाधव पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

४) हुडयांच्या मागणी करुन जुडलेल्या लग्नास नकार दिल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक ०९/०४/२०१७ ते ०१/०५/२०१७ चे १२.०० पावेतो यातील फिर्यादीची भाची कु. रजीया रमेश बोरकर वय २५ वर्ष, रा. परसोडी नाग हिचे आरोपी क्र. १ शी लग्न जुडुन साक्षेगंध झाले असतांना यातील चारही आरोपीतांनी रोख अडीच लाख रुपये हुंडयाची मागणी करुन लग्न करण्यास नकार देवुन पक्का झालेला रिश्ता तोडल्याने फिर्यादी नवनाथ काशीराम आकरे वय ४२ वर्ष, रा. सिरसाळा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ४ हुंडाबळी अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. उईके पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

५) अल्पवयीन मुलींना पळवुन नेल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक ३०/०४/२०१७ चे ११.०० वा. दरम्यान यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी व भाची या दोन्ही फिर्यादीचे घरी हजर असतांना फिर्यादी ही १०.०० वा कामाला गेली व १७.०० वा. कामावरुन परत आली तेव्हा त्या मुली घरी दिसल्या नाही शेजारी व गावात शोधाशोध केली असता मिळुन आल्या नाही. यातील संशयीत आरोपी हा विटा भट्टीचे कामाला होता. अल्पवयीन मुलींची ओळख होवुन बोलाचाली सुरु होती त्यामुळे दोघींना त्यानेच पळवुन नेले असावे अशी फिर्यादीने संशयास्पद तोंडी रिपोर्ट दिल्याने पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३६३ भादवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. वानखेडे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

६) अतीमद्य प्राषण केल्याने इसमाचा उपचारा दरम्यान मृत्यु :–

दिनांक ०१/०५/२०१७ चे ०७.३५ वा दरम्यान यातील मृतक दिवकर श्रीराम वंजारी वय ४५ वर्ष, रा. डोंगरगाव याने अती मद्य प्राषन केल्याने त्याची प्रकृती बिघडल्याने त्यास औषधोपचारा करीता सा.रु भंडारा येथे आयसीयु विभागात भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉक्टरी मेमो वरुन पोस्टे भंडारा येथे कलम ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्रावरुन सरतर्फे फिर्यादी पोहवा. बांभरे यांचे रिपोर्ट वरून पोस्टेला कलम १७४ जाफौ. चा नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बांभरे पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहे

७) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक ०१/०५/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुन ७० प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०२ तीन सिटर वाहनांवरती ०९ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ५९ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र.९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.